पी-४ संवर्गातील अधिव्याख्यात्यांना
सेवेत व वेतनात संरक्षण देणेबाबत....

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : एनजीसी-२०९८/६४७२५/[४०५७]/विशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२
दिनांक : १५ मे २०००

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्यात १०+२+३ हा नवीन शैक्षणिक आकृतिबंध १९७५-७६ पासून सुरू करण्यात आला. या नवीन आकृतिबंधामुळे महाविद्यालयातील शैक्षणिक वर्षाचे एक वर्ष कमी झाले. त्यामुळे काही अतिरिक्त शिक्षकांना त्यांना नोकरीमध्ये सामावून घेण्यासाठी शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार पाच वर्गामध्ये विभाजन करण्यात आले व या मार्गदर्शक तत्त्वानुसार त्यांना पी-१, पी-२, पी-३, पी-४ व पी-५ असे संबोधण्यात आले. पी-४ संवर्गातील शिक्षकांची खालीलप्रमाणे परिभाषा करण्यात आली होती.

"College tutors/demonstrators and persons in equivalent grade (Rs.250-400) who were either confirmed in dlear vacancies of who had completed two years of service in clear vacancies in a college of colleges under the same management on or before 7th February, 1975 and who fulfill the qualifications prescribed by the Universith condermed fof appointment as Lecturers and are, therefore, entitled to deemed date of 1st July, 1975'

या परिभाषेप्रमाणे महाविद्यालयातील जे ट्युटर/डेमॉन्स्ट्रेटर,अधिव्याख्याता पदाकरिता असणारी शैक्षणिक अर्हता धारण करीत होते त्यांना दिनांक १ जुलै, १९७५ पासून अधिव्याख्याता पदाची मानीव तारीख देण्यात आली. १०+२+३ हा शैक्षणिक आकृतिबंध १९७५-७६ पासून सुरू झाल्यानंतर महाविद्यालयीन वर्ग कमी झाल्यामुळे जे अधिव्याख्याता अतिरिक्त ठरले त्यांना काही काळ त्याच संस्थेच्या कनिष्ठ महाविद्यालयात सामावून घेण्यात आले होते. वरिष्ठ महाविद्यालयात पुन्हा आवश्यक तो कार्यभार उपलब्ध झाल्यावर यापैकी जे अधिव्याख्याता वरिष्ठ महाविद्यालयात गेले त्यांचा कनिष्ठ महाविद्यालयातील सेवाकालावधी हा वरिष्ठ महाविद्यालयातील अधिव्याख्याता या पदाकरिता सेवासातत्य म्हणून धरण्याची बाब काही काळ शासनाच्या विचाराधीन होती.

शासनाने शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १५.१०.१९८७ रोजी नियुक्त केलेल्या चार सदस्यीय समितीने अशा अधिव्याख्यात्यांचे कनिष्ठ महाविद्यालयातील सेवाकालावधी हा सेवेकरिता ग्राह्य धरण्याबाबत शिफारस केली होती. तथापि, ही शिफारस पूर्णतः शासनाने मान्य केली नव्हती. पी-४ संवर्गातील अधिव्याख्यात्यांनी वेळोवेळी केलेल्या विनंतीनुसार शासनाने हा मुद्दा फेरविचारार्थ घेण्याचे ठरविले व यावर संपूर्णविचार करून एक निर्णय घ्यावा म्हणून शासनाने या पी-४ संवर्गातील अधिव्याख्यात्यांनी कनिष्ठ महाविद्यालयात केलेली सेवा ही वरिष्ठ महाविद्यालयातील वेतन संरक्षण व सेवाज्येष्ठतेकरिता ग्राह्य धरण्याबाबतचा निर्णय घेतला असून त्याप्रमाणे पुढील शासन आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

शासनाने पी-४ संवर्गातील अधिव्याख्यात्यांना पुढील अटींच्या अधीन राहून, त्यांना वरिष्ठ महाविद्यालयातील अधिव्याख्याता पदावरील नेमणुकीच्या दिनांकापासून रु. ७००-१६०० या वेतनश्रेणीत व सेवेत संरक्षण देण्याबाबत निर्णय घेतला आहे.

१. रु. ७००-१६०० या वेतनश्रेणीत ते नियमित रिक्त पदावर असावे.

२. १०४-२४-३ ह्या आकृतिबंधामध्ये लागल्यामुळे ते वरिष्ठ महाविद्यालयात अतिरिक्त ठरले असावेत.

३. अशा तऱ्हेने अतिरिक्त ठरल्यामुळे ते त्याच व्यवस्थापनाच्या कनिष्ठ - महाविद्यालयात सामावले गेले असावेत.

४. त्याच व्यवस्थापनाचे वरिष्ठ महाविद्यालयात रु. ७००-१६०० या वेतनश्रेणीत अधिव्याख्यात्यांची जागा रिकामी झाल्यावर त्यावर त्यांची नेमणूक झाली असावी किंवा जर वरिष्ठ महाविद्यालयात अधिव्याख्यात्यांची जागा रिकामी झाली नसल्यास ते त्याच व्यवस्थापनाच्या कनिष्ठ महाविद्यालयात काम करीत असावेत.

५. व्यवस्थापनाने त्यांना सेवेतून कमी केलेले नसावे.

६. त्यांनी स्वतःहून कधीही अधिव्याख्याता पदाचा राजीनामा दिलेला नसावा.

७. सेवेत संरक्षण दिल्यामुळे देय होणाऱ्या काल्पनिक वेतनवाढी संबंधितांना देय ठरतील, तथापि मागील थकबाकी संबंधितांना दिली जाणार नाही.

या पी-४ संवर्गातील अधिव्याख्यात्यांना सेवेत संरक्षण दिल्याने त्यांना देय ठरणाऱ्या वेतनवाढी ह्या काल्पनिक वेतनवाढी असल्यामुळे त्यानुसार निश्चित होणाऱ्या सुधारित वेतनाची रक्कम आदेश निर्गमनाच्या दिनांकापासून या -

कर्म

कर्मचा-यांना रोखीने देण्यात यावी.

यावर होणारा खर्च हा मुख्य लेखाशीर्ष २२०२, सर्वसाधारण शिक्षण ०३, विद्यापीठीय व उच्च शिक्षण, मागणी क्र. डब्ल्यु-२ या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो चालू वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक : २१८७३/सेवा-३ दिनांक १७.११.९९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-

[रु.ना. कटलावार]

अवर सचिव, महाराष्ट्र शासन